## —: प्रेसनोट :— दि. २०/०१/२०२०

फिर्यादी यांचे विरुध्द वडाळा टी.टी. पोलीस ठाणे, मुंबई येथे दाखल गुन्हयावरुन तडीपार व एम.पी.डी. ए.ची कारवाई न करण्याकरीता फिर्यादी यांचेकडे लोकसेवक यांनी रु. ७०,०००/— लाचेची मागणी करुन फिर्यादी कडे उपलब्ध असलेली लाचेची रक्कम रु. १०,०००/— स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | ०५/२०२० |
| कलम | ७, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | श्री. चंद्रकांत जबरदस्त जाधव, वय ५७ वर्षे, धंदा—नोकरी (पोलीस निरीक्षक, नेमणुक वडाळा ट्रक टर्मिनस पोलीस ठाणे, वडाळा, मुंबई.) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ७०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १०,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हा वडाळा टी. टी. पोलीस ठाणेच्या अभिलेखावरील गुन्हेगार असुन, फिर्यादीवर दि. १४/०१/२०२० रोजी वडाळा टी. टी. पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ते दि. १५/०१/२०२० रोजी जामिनावर मुक्त झाले आहेत. फिर्यादीवर तडीपार व एम.पी. डी. ए. ची प्रतिबंधात्मक कारवाई न करण्यासाठी लोकसेवक पोलीस निरीक्षक चंद्रकांत जबरदस्त जाधव यांनी दिनांक १९/०१/२०२० रोजी रुपये ७०,०००/ — लाचेची मागणी केली.<br>फिर्यादी यांना लोकसेवक याना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि., मुंबई विभाग यांचेकडे दिनांक १९/०१/२०२० रोजी केलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान फियादी यांनी लोकसेवकास त्यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम रु. ७०,०००/— ची व्यवस्था झाली नसल्याने दोन दिवसाची मुदत मागुन सध्या रू.१० हजाराची व्यवस्था झाली असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवकाने रू.१० हजार लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याने दिनांक २०/०१/२०२० रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा कारवाई दरम्यान दिनांक २०/०१/२०२० रोजी लोकसेवक यांना वडाळा टी. टी. पोलीस ठाणे समोरील रस्त्यावर फिर्यादी यांचेकडून रु. १०,०००/— लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क**:—लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक : www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईलॲप : www.acbmaharashtra.net

(वंदना नारकर)
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई